# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे -४

## परिपत्रक

क्र.रा.मं./पापुई-६/उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम/४९६१, दि.१९/०९/२०१८

विषय :- राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत उच्च माध्यमिक स्तरावरील (लेव्हल-३ व लेव्हल-४) व्यवसाय शिक्षण योजनेंतर्गत नव्याने व्यवसाय विषय सुरू करणेबाबत.

संदर्भ: १. क्र.रा.मं./पापुई-६/उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम/१८७६, द.१०/०४/२०१७
२. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.रा.मा.शि.अ./व्य.शि./७०/(२१/१७)/२०१८/८९८, दि.३०.०८.२०१८.

राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत राज्यात शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून व्यवसाय शिक्षण माध्यमिक स्तर व शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून उच्च माध्यमिक स्तर योजनेची अंमलबजावणी सुरू झालेली आहे.

सदर व्यावसायिक अभ्यासक्रम हे NSQF (National Skill Qualification Framework) प्रमाणे पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल एज्युकेशन (PSSCIVE) भोपाळ यांचे मान्यताप्राप्त असल्याने शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त शासन आदेशानुसार हे व्यावसायिक अभ्यासक्रम इ.११वी आणि इ.१२ साठीच्या नियमित वैकल्पिक विषयांतील १ विषय वगळून त्याऐवजी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील १ विषय कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना घेता येईल. तथापि, जे विद्यार्थी व्यासाय शिक्षण अभ्यासक्रमातील विषयासह इयत्ता ९ वी आणि इ.१० वी उत्तीर्ण असतील अशाच विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी आणि इ.१२ वी साठी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील विषय घेऊन परिक्षेस प्रविष्ठ होता येईल.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत केंद्र शासनातर्फे मंजूरी मिळालेले पुढील विषय शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये इयत्ता ११ वी साठी व शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये इयत्ता १२ वी साठी सुरू करण्यात आले आहेत व त्याची प्रथम परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०१८ मध्ये आयोजित झालेली आहे.

| Sr. No. | Subjects | Subject Code No. |
|---|---|---|
| 1 | Automobile Service Technician | E-1 |
| 2 | Multi Skill Technician (General Engineering) | E-2 |
| 3 | Multi Skill Technician (Electrical) | E-3 |
| 4 | Multi Skill Technician (Gardening, Landscaping & Nursery Management) | E-4 |
| 5 | Automobile Service Technician(With Bridge Course) | E-5 |
| 6 | Multi Skill Technician (Food Processing & Preservation) | E-6 |
| 7 | Retail Sales Associate | E-7 |

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.रा.मा.शि.अ./व्य.शि./७०/(२१/१७)/२०१८/८९८, दि.३०.०८.२०१८ नूसार खालील विषय शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इ. ११ वी (लेव्हल-३) साठी आणि शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून इ.१२ (लेव्हल-४) साठी सुरु करण्यात आले आहेत. **या विषयांची इ.१२ वी ची प्रथम परीक्षा मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०१९ मध्ये होणार आहे.**

| Sr. No. | Subjects | Subject Code No. |
|---|---|---|
| 1 | Healthcare-General Duty Assistant | E-8 |
| 2 | Beauty & Wellness - Beauty Therapist | E-9 |
| 3 | Sports - Physical Trainer | F-1 |

**उपरोक्त तिनही विषयांची विषय योजना, मूल्यमापन योजना या सर्व बाबी राज्य मंडळाच्या परिपत्रक** क्र.रा.मं./पापुई-६/उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम/१८७६, दि.१०/०४/२०१७ नूसार उपरोक्त ७ विषयांप्रमाणेच राहील.

(२/३)

उपरोक्त विषयाचे अभ्यासक्रम पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल एज्युकेशन (PSSCIVE) भोपाळ या संस्थेचे मान्यताप्राप्त असल्याने शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे. सदर अभ्यासक्रम तसेच या विषयांचे प्रश्नपत्रिका आराखडे मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

तरी ज्या उच्च माध्यमिक शाळांमध्ये राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाअंतर्गत NSQF प्रमाणे (लेव्हल-३ व ४ चे), नव्यान व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. त्याप्रमाणे उच्च माध्यमिक शाळा प्रमुखांनी कार्यवाही करावी सदर परिपत्रक संबंधित उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांचे निदर्शनास आणून शाळांच्या सूचना फलकावर लावण्यात यावे व केलेला कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळामार्फत सादर करावा.

ठिकाण : पुणे - ४११००४
दिनांक : ११/०९/२०१८

सचिव,
महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे - ४११ ००४.

---

क्र.कोविमं/उच्चमाध्य.-गोपनिय/२०१८/ १७४९
दिनांक -०४-१०-२०१८

प्रति,
प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

विषय:- राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत उच्च माध्यमिक स्तरावरील-(लेव्हल-३ व लेव्हल-४) व्यवसाय शिक्षण योजनेतंर्गत नव्याने व्यवसाय विषय सुरु - करणेबाबत . . .

उपरोक्त विषयास अनुसरुन वरील परिपत्रकाप्रमाणे आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.